# तरुणांची शक्ती खेळातून दिसावी, बंदुकीतून नव्हे

## श्री श्री रविशंकर यांचे जागतिक परिषदेत भाषण




झुरिच येथील क्रीडा क्षेत्रातील नैतिकता या विषयावरील चर्चासत्रात मुलाखतीदरम्यान आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री श्री रविशंकर.

नाशिक, दि. २१ (प्रतिनिधी)- जगातील तरुणांमध्ये असलेली शक्ती ही खेळाच्या माध्यमातून दिसायला हवी. बंदुकीच्या मार्गाने नको, असे आवाहन आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री श्री रविशंकर यांनी जगभरातील तरुणांना केले.

झुरिच येथे बोलावण्यात आलेल्या क्रीडा क्षेत्रातील नैतिकता या विषयावरील जागतिक शिखर परिषदेत श्री रविशंकर यांचे भाषण झाले. सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी क्रीडा क्षेत्र किती उपयोगी पडू शकते, या विचार मंथन करण्यासाठी राजनीती, उद्योग, शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांना बोलावण्यात आले होते.

यावेळी श्री रविशंकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी खेळाडूंना सहभागी करून घेतले तर चांगले ध्येय प्राप्त करून घेता येईल. या शिखर परिषदेसाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही संदेश पाठविला होता. क्रीडा क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तींमध्ये झालेली ही चर्चासत्रे, शिबिरे आणि कार्यशाळा उपयुक्त ठरतील, असेही मोदींनी या संदेशात स्पष्ट केले. भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार महेंद्रसिंग धोनी यानेही आपल्या संदेशात खेळाडू वृत्ती जोपासली तर नक्कीच एकमेकातील संवाद वाढीस लागतो, असे स्पष्ट केले. फिफाचे अध्यक्ष सेप ब्लॅटर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.